1) पुढारी पू. पान क्र. 3

दि. 07/01/2023

# वसईत सनातन धर्मसभांतर्गत हिंदू महासंमेलन


## देशभरातील साधू-संत, महंत आणि हिंदुत्वनिष्ठ सहभागी होणार

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

सनातन धर्म सभेच्या वतीने वसईतील बऱ्हामपूर येथील अयप्पा मंदिरात ७ आणि ८ जानेवारी २०२३ हे दोन दिवस हिंदू महासंमेलन २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात भारतभरातील साधू-संत, महंत आणि हिंदुत्वनिष्ठ सहभागी होणार आहेत. 'साधुसंतांचा महाकुंभ' असाही उल्लेख या महासंमेलनाचा करण्यात आला आहे.

आज सकाळी ८ वाजता साधुसंतांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ होणार आहे. सकाळी ११ वाजता आचार्य के. आर मनोज यांचे विशेष व्याख्यान असणार आहे. सायंकाळी ५ वाजता सर्व संत उपस्थित राहणार असून त्यांचे स्वागत विधीवत पूजा व सर्व संत उपस्थितांना संबोधित करतील. रविवार ८ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता स्वाधी संगमेश्वरानंद सरस्वती यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला संमेलन तर सायंकाळी ४





वाजता हिंदू युवा वर्गास दिशा देणारा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी केरळ येथील धार्मिक असे गुलीकन थेय्यम (कालभैरव) कार्यक्रम असून त्यानंतर कार्यक्रमाची सांगता होईल.

सध्या हिंदू धर्म, धर्मातील परंपरा आणि धर्म विचार हे नव्या पिढीला ज्ञात करून देण्याची नितांत गरज बनली आहे. यासाठी कुणीतरी पुढाकार घेण्याची गरज होती. अशा वेळी या भूमीत हे संमेलन आयोजित करून एक प्रकारे संदेश देण्याचा प्रयत्नही होणार आहे. या संमेलनासाठी देशभरातून हिंदुत्वनिष्ठ येणार आहेत. त्यांनी आगाऊ नोंदणी केली आहे. दोन दिवस मान्यवर आणि उपस्थितांच्या भोजन आणि निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती सनातन धर्म सभाचे आयोजक उत्तम कुमार यांनी दिली.

या महासंमेलनाला तुंगारेश्वर येथील बालयोगी सदानंद महाराज, स्वामी कृष्णानंद सरस्वती, के.पी. शशिकला, स्वामी चिदानंद पुरी, विश्वेश्वरानंद सरस्वती, संगमेशानंद सरस्वती, महंत सदानंदवन महाराज, शिवांगीनंद गिरी महाराज, शंकर गायकर, साध्वी प्राची, निर्भयानंद सरस्वती (चिन्मया मिशन, वसई), ब्रम्हचारी हरिगोपाल दास (इस्कॉन, वाडा) आणि स्वामी संगम गिरी महाराज इत्यादी साधू-संत आणि महंत या संमेलनाला उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमा संदर्भात अधिक माहिती साठी उत्तमकुमार यांना संपर्क करण्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

2) पुढारी पू. पान क्र. 3

# चौक बंदरावर नांगरलेल्या बोटीला आग

## मच्छीमार कुटूंबावर उपासमारीची वेळ

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

उत्तनच्या चौक येथील बंदरात नांगरून ठेवलेल्या एका मासेमारी बोटीला अचानक आग लागल्याची घटना शुक्रवारी पहाटे ४ वाजता घडली. आगीत बोटीचे संपूर्ण नुकसान झाले असून काही महिन्यांपूर्वी याच बोटीला वादळाच्या तडाख्यामुळे अपघात झाला होता. यंदा मात्र ती आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने तिच्यावर अवलंबून असलेल्या मच्छीमार कुटूंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

चौक बंदरात बस्त्याव पास्कू मुंबईकर या मच्छीमाराची जॉनपॉल ३ हि मासेमारी बोट (क्रमांक आयएनडी एमएच १ एमएम ९९१६) मध्ये शुक्रवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास शॉर्टसर्किट होऊन तिला आग लागल्याची घटना घडली. हि बोट



### भरपाई मिळणे अपेक्षित

या बोटीला नैसर्गिक आपत्तीमुळे आग लागल्याचा दावा विल्यम जॉर्जी यांनी केला असून त्याची नुकसान भरपाई शासनाकडून देण्यात यावी, यासाठी त्यांनी संबंधित शासकीय यंत्रणांसह लोकप्रतिनिधींकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे. बोटीचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास मत्स्यव्यवसाय विभागाकडून कोणतीही मदत मिळत नाही. त्यामुळे किमान नैसर्गिक आपत्ती निधीतून नुकसान होणाऱ्या बोटींना भरपाई मिळणे अपेक्षित आहे.

गुरुवारी मासेमारी करून आल्यानतंर चौक बंदरात नांगरून ठेवली होती. मात्र पहाटेच्या सुमारास अचानक सोसाट्याचा वारा सुटल्याने बोटीतील बॅटऱ्यांमधील शॉर्ट सर्किटमुळे, आग लागल्याची माहिती श्री डोंगरी चौक फिशरमन सहकारी सोसाटीचे विल्यम व गोविंद जॉर्जी यांनी सांगितले. आगीत बोटीतील इंजिनसह सर्व साहित्य जळून खाक झाले.

काही महिन्यांपूर्वी सुद्धा याच बोटीला समुद्रात उठलेल्या वादळामुळे अपघात झाला होता. त्यावेळी सुद्धा हि बोट चौक बंदरात नांगरण्यात आली होती. वादळाच्या तडाख्याने तिचा दोरखंड तुटून ती तेथील एका दगडावर आदळून तिचे नुकसान झाले होते. तर दुसरी बोट बुडाली होती. बोटीला आग लागल्याची माहिती मिळताच बोटीचे तांडेल कॅजीटन पास्कू मुंबईकर यांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांना किरकोळ दुखापत झाली.

आगीमुळे बोटीचे सुमारे २० ते २२ लाखांचे नुकसान झाले असून याच बोटीने शुक्रवारी मच्छीमार व खलाशी पुन्हा मासेमारीकरीता जाणार होते. मात्र तिचे आगीमुळे नुकसान झाल्याने आम्ही मासेमारीला वंचित झाल्याची उद्विग्न भावना मुंबईकर कुटूंबाने व्यक्त केली.

CamScanner

३) लोकसत्ता पु. पान क्र. १ दि: 07/01/2023

# नियमांचे सर्रास उल्लंघन

## वसई, विरारमध्ये वाहतूक नियमांच्या उल्लंघनाच्या दीड लाख घटना

सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता

**वसई :** २०२२ या वर्षात वसई, विरार शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याच्या एकूण एक लाख ४५ हजार ९२७ प्रकरणांची नोंद झाली आहे. तीन कोटी १९ लाख ९७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. यामध्ये वसई विभागाची दंडाची वसुली ७९ टक्के तर विरार विभागाची दंडाच्या वसुलीची टक्केवारी ही ४४ टक्के आहे.

शहरात विरार आणि वसई असे दोन वाहतूक विभाग आहेत. या विभागांकडून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येते. २०२२ या वर्षात वाहतूक नियमांच्या उल्लंघनाची एक लाख ४५ हजार प्रकरणे नोंदविण्यात आली. त्यामध्ये अवैध प्रवासी वाहतूक, विनापरवाना वाहन चालवणे, सीट बेल्ट न लावणे, सिग्नल तोडणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे, नंबर प्लेट न लावणे किंवा चुकीच्या नंबर प्लेट लावणे, चुकीच्या ठिकाणी पार्किंग करणे अशा विविध नियमांचा समावेश आहे.

विरार विभागात सर्वाधिक म्हणजे ८२ हजार प्रकरणांची तर वसई विभागात ६२ हजार ८४४ प्रकरणांची नोंद झाली. वसई आणि विरार विभागांनी एकूण ३ कोटी १९ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. वसईतून २ कोटी ४३ लाख ७७ हजार तर विरार विभागातून एक कोटी ५६ लाख ९०० रुपयांच्या दंडाची वसुली करण्यात आली आहे. वसई विभागाची दंडाच्या वसुलीची टक्केवारी सर्वाधिक म्हणजे ७९ टक्के आहे. विरार विभागातून ४४ टक्के वसुली झाली आहे.

वाहतुकीचे नियोजन करणे, बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्याबरोबरच दंडाच्या वसुलीचे मोठे आव्हान आमच्यापुढे होते. २०२२ या वर्षात आम्ही दंडवसुलीवर भर दिला होता. त्यामुळे यंदा आमच्या विभागात दंडाची वसुली ही मागील वर्षाच्या तुलनेत जास्त म्हणजे ७९ टक्के एवढी झाली आहे. ती अधिक वाढविण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती वसई वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी दिली.

आम्ही वर्षभर विविध मोहिमा राबवून वाहनचालकांमध्ये जनजागृती करत असतो.

याशिवाय कारवाया करण्यासाठी नाकाबंदी तसेच विशेष मोहीम आखत असतो. कारवाईमुळे बेशिस्त तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर आळा बसेल असा विश्वास विरार वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम कारंडे यांनी व्यक्त केला.

### वसई विभाग

- एकूण प्रकरणे- ६२ हजार ८४४
- एकूण दंड- ३ कोटी ४१ लाख ५२ हजार ५०
- भरलेल्या दंडाची प्रकरणे- ४९ हजार ९२५
- भरलेल्या दंडाची रक्कम- २ कोटी ४३ लाख ७७ हजार
- न भरलेल्या दंडाची प्रकरणे- १२ हजार ९१९
- न भरलेल्या दंडाची रक्कम- ९७ लाख ७५ हजार ३००
- दंड भरल्याची रक्कम- ७९.४४ टक्के



### विरार विभाग

- एकूण प्रकरणे- ८३ हजार ८३
- एकूण दंड- २ कोटी ६२ लाख ४७ हजार
- भरलेल्या दंडाची प्रकरणे- ३६ हजार ४६४
- भरलेला दंड - १ कोटी ५६ लाख २ हजार ९००
- न भरलेल्या दंडाची प्रकरणे- ४६ हजार ६१८
- न भरलेल्या दंडाची रक्कम- १ कोटी ५६ लाख ८४ हजार १५०
- दंड भरलेली रक्कम- ४४ टक्के

### प्रमुख नियमांचे उल्लंघन

| ५८१ | ११४ | ११००० | १०४१ | २८१० | १५६५ |
|---|---|---|---|---|---|
| विना हेल्मेट | मद्यप्राशन करून वाहन चालवणे | सीट बेल्ट न लावणे | विनापरवाना | सिग्नल | नंबर प्लेट |

४) लोकसत्ता पु. पान क्र. १

# वसई शहरातील १४५ रिक्षा तळांना मंजुरी

लोकसत्ता प्रतिनिधी

**विरार :** वसई-विरार महापालिकेने शहरातील रखडलेल्या १४५ रिक्षा तळांना अखेर मंजुरी दिली आहे. अनेक वर्षांपासून ही मंजुरी रखडल्याने शहरात बेकायदा रिक्षा तळांचे पीक आले होते. यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत वाहतूककोंडीची समस्या वाढली होती. पण आता पालिकेने मंजुरी दिल्याने शहरात अधिकृत रिक्षा तळ उभारले जाणार आहेत.

पालिकेने अजूनही शहरात एकही अधिकृत वाहनतळ निर्माण केले नाही. केवळ पालिकेच्या बससाठी थांबे तयार करण्यात आले. तर इतर खासगी प्रवासी वाहनांना मात्र कोणतीही तसदी घेतली नाही. यामुळे शहरात बेसुमार वाहन तळ उभे राहिले. यात रिक्षा तळाचा मोठा भरणा झाला. यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होऊन वाहतूककोंडीने नागरिक हैराण झाले आहेत. परिवहन उपप्रादेशिक कार्यलयाकडून जून २०२० मध्ये सर्वेक्षण करून १४५ रिक्षा तळांना मंजुरी देण्यात आली होती. पण निर्णय नसल्याने हे काम रखडले होते. त्यात रिक्षा चालक मालक संघटनांनी २५६ रिक्षा तळांची मागणी केली होती. पण अद्यापही १०० तळांच्या बाबतीत कोणताही निर्णय नाही. महापालिका आयुक्त यांनी परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांना मंजूर केलेल्या १४५ रिक्षा तळांच्या बाबतीत निर्णय घेऊन ती तातडीने उभी करण्याचे आदेश बांधकाम विभागाला देण्यात आले आहे. महिला रिक्षाचालकांसाठी सुद्धा स्वतंत्र रिक्षा थांबे तयार केले जाणार आहेत. रिक्षा थांबे तयार करण्यासाठी बांधकाम विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. लवकरच त्यांचे काम सुरू केले जाणार आहे. तसेच इतर वाहनतळांच्या बाबतीतसुद्धा लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. त्यासाठी सर्वेक्षणाचे काम सुरू आहे.

CS CamScanner

5) पुढारी पान क्र. 6 दि. 07/01/2023

# पोलिस गणवेश भत्त्यात वाढ

## उपनिरीक्षक ते अप्पर पोलिस अधीक्षकांना वर्षाला मिळणार ६ हजार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील पोलिस उपनिरीक्षक ते अप्पर पोलिस अधीक्षक दर्जाचे अधिकारी यांच्या गणवेश भत्त्यात वाढ करण्याचा शासन निर्णय गृहविभागाने गुरुवारी (दि.५) काढला. यानुसार प्रतिवर्षी पोलिस् अधिकाऱ्यांना आता ६ हजार रुपये गणवेश अनुदान मिळणार आहे. पूर्वी चार वर्षांकरिता ५ हजार रुपये इतके अनुदान मिळत होते.

राष्ट्र निर्माण संघटनने ६ वर्षांपूर्वी पोलिस महासंचालक यांच्याकडे ही मागणी केली होती. गणवेश अनुदान वाढ झाल्याने संघटनच्या प्रयत्नांना यश आल्याची माहिती संघटन संचिव नीलेश नागोलकर यांनी शुक्रवारी दिली.



राज्यातील पोलिस दलात असलेले पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) ते अप्पर पोलिस अधीक्षक दर्जाच्या अधिकारी यांना ५ हजार रुपये गणवेश अनुदान देण्यात येत होते. या गणवेश अनुदानामध्ये वाढ करण्याची मागणी सातत्याने होत होती. ४ वर्षांतून एकदा देण्यात येणारे गणवेश अनुदान हे ५ हजार रुपये होते. बाजारभावातील दरवाढीचा विचार करता हे अनुदान अत्यल्प होते. दरम्यान, पोलिस उपनिरीक्षक ते अप्पर पोलिस अधीक्षक दर्जाचे अधिकारी यांच्या गणवेश अनुदानात वाढ करण्याचा शासन निर्णय गृहविभागाने गुरुवारी काढला. आता प्रतिवर्षी ६ हजार रुपये या अधिकाऱ्यांना अनुदान मिळणार आहे. हा शासन आदेश एक जानेवारी २०२३ पासून लागू होणार आहे.

याबाबत नीलेश नागोलकर म्हणाले, पोलिस अधिकारी यांना ४ वर्षांतून एकदाच ५ हजार रुपये मिळणारे गणवेश अनुदान फार अपुरे होते. यासाठी राष्ट्रनिर्माण संघटन २०१३ पासून गणवेश अनुदानासाठी काम करत आहे. शासनाचा २०१६ चा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे पत्रही आपल्याकडे होते. नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात या विषयावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही मागणी केली होती. ती आज पूर्ण झाली.

6) पुढारी पान क्र. 1

# लाच घेताना रंगेहाथ पकडले तरी कर्मचाऱ्याचे नाव माध्यमांना देऊ नका

## अधिकारी महासंघाचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

लाच घेताना रंगेहात पकडले तरी कर्मचाऱ्याचे नाव माध्यमांना देऊ नका, अशी मागणी करणारे पत्र राजपत्रित अधिकारी महासंघाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविले आहे.

लाचलुचपत किंवा इतर गुन्ह्यांतर्गत आरोपी असलेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यास न्यायालयाने दोषी ठरविल्यानंतरच त्याचे नाव व छायाचित्र सार्वजनिक करावे, असे साकडे महासंघाचे मुख्य सल्लागार ग.दि. कुलथे यांनी या पत्राद्वारे घातले आहे.

एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याच्याबाबतीत लाचलुचपत व इतर गुन्ह्यासंदर्भात कारवाई झाल्यास संबंधित विभागाकडून त्या संशयिताचे नांव व छायाचित्र प्रसारमाध्यमांकडे दिले जाते. परंतु, न्यायालयीन निवाड्यांचे अवलोकन केले असता कारवायांमध्ये अटक केलेले सर्वच संशयित हे दोषी नसतात, असे आढळून आल्याचे कुलथे यांचे म्हणणे आहे.

कालांतराने संशयित कर्मचारी न्यायालयात निर्दोष सुटतात. मात्र, कारवाई व न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान माध्यमांमध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांमुळे त्याला नाहक बदनामी व सामाजिक रोषाचा सामना करावा लागतो. त्यांच्या निष्पाप कुटुंबियांचीदेखील समाजात मानहानी होते. न्यायालयातून निर्दोष सुटल्यानंतर गेलेली प्रतिष्ठा त्यांना पुन्हा मिळत नाही. एक प्रकारे संबंधित कर्मचाऱ्याच्या मानवाधिकारांचे हनन होते. तसेच त्यांच्या कुटुंबीयांवरही मोठा अन्याय होतो.

**लाचखोरीत आघाडीचे महसूल विभाग**

| | |
|---|---|
| पुणे | १५५ |
| नाशिक | १२६ |
| औरंगाबाद | १२२ |
| ठाणे | ८४ |
| नागपूर | ७४ |
| अमरावती | ६४ |
| नांदेड | ६० |
| एकूण | ७२७ |

एखाद्या कर्मचाऱ्याचा गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय त्याचे नाव व छायाचित्रे प्रसारमाध्यमांना देऊ नये, असे राजस्थान भ्रष्टाचार निरोधक ब्युरोच्या महानिर्देशकांनी निर्देश दिले आहेत. याबाबत त्यांनी परिपत्रकही काढले आहे. या परिपत्रकाचे अवलोकन करून राज्य सरकारनेही जोपर्यंत न्यायालयाद्वारे एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याच्या विरोधात गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत आरोपी किंवा संशयितांचे नाव व छायाचित्र सार्वजनिक करु नये, असे स्पष्ट निर्देश देणारे परिपत्रक जारी करावे, असे कुलथे यांनी पत्रात नमूद केले आहे.

CamScanner

7) पुण्यनगरी पृ. पान क्र. १

दि. 07/01/2023

# पोलीस भरतीच्या उमेदवारांना गुणाबाबत शंका असल्यास आयुक्तालयाशी संपर्क करावा

## पोलीस प्रशासनाचे आवाहन

**मीरा रोड :** पोलीस भरतीच्या उमेदवारांना गुणांबाबत शंका असल्यास ते आयुक्तालयाशी संपर्क साधून शंकेचे निरसन करू शकतात, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

मीरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयातील चालक पोलीस शिपाई पदांसाठी २ जानेवारी पासून थेट भरती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आलेली आहे. या भरतीमध्ये ९९६ पोलीस पदांसाठी भरती केली जाणार आहे. सलग तीन दिवस चालक पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया सुरू होती. मैदानी चाचणी पार करत कौशल्य चाचणी पात्र असणाऱ्या उमेदवारांची यादी व कौशल्य चाचणी ठिकाण व वेळ याबाबत उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर, मोबाइल क्रमांकावर कळवण्यात येणार आहे. चालक पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मैदानी चाचणीचे गुणपत्रक पोलीस आयुक्तालयाने सादर केले आहे.

चालक पोलीस शिपाई भरतीमधील शारीरिक चाचणूच्या गुणांची यादी ु५५.स्त्रह्ली.ह्न५.ळ या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. पोलीस मुख्यालयात यादी लावण्यात आलेली आहे. उमेदवारांना आपल्या गुणांबाबत कोणतीही शंका असल्यास त्यांच्या शंका दूर करण्यासाठी पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांना नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाईंदर पश्चिम येथे भेटून त्यांना असलेल्या शंकेबाबत विचारपूस करू शकतात. त्या व्यतिरिक्त शीङ्१क्षर्ई१ु.५५@स्त्रह्ली.ह्न५.ळ या ई-मेलवर किंवा ०२२-३५००६११४ या फोन नंबरवर संपर्क साधू शकतात. भरती प्रक्रिया सुरू असलेल्या ठिकाणी गैरप्रकार होऊ नये व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी व उमेदवारांवर लक्ष ठेवण्यासाठी जवळपास ५० कॅमेरे लावण्यात आले असून, पोलिसांचे सीसीटीव्ही, भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे व हँडीकॅमद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्यांची बारीक नजर असणार आहे. ही प्रक्रिया जवळपास दोन महिने सुरु राहाणार आहे.संपूर्ण प्रक्रिया जलद व पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे.

8) म. टा. पृ. पान क्र. 1

# अपहृत बाळाची सुटका; टोळीला अटक

म. टा. वृत्तसेवा, वसई

नालासोपाऱ्यातील दोन महिन्यांच्या बाळाची खरेदी-विक्री करणाऱ्या पाच आरोपींच्या टोळीला गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांनी गुजरातमधून अटक केली आहे. या प्रकरणी विरार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अपहरण करून नेलेल्या दोन महिन्यांच्या बाळाची पोलिसांनी सुटका करून त्याला सुखरूप त्याच्या आईच्या ताब्यात दिले आहे.


नालासोपाऱ्याच्या अलकापुरी येथे राहणाऱ्या २३ वर्षीय कचरावेचक महिलेला दोन महिन्यांचे बाळ आहे. कामादरम्यान तिची विरार येथील कुंभारपाडा येथे राहणाऱ्या अन्य एका कचरावेचक महिलेशी ओळख झाली. त्या महिलेने मुलाचा चांगला सांभाळ करू शकतील असे श्रीमंत घरातील लोक ओळखीचे असल्याचे सांगितले. कामादरम्यान मुलाचा सांभाळ करणे अवघड होत असल्याने या महिलेने याला होकार दर्शविला. त्या महिलेने कृष्णा या व्यक्तीसह इतर तिघांना याची कल्पना दिली आणि त्यांनी संगनमताने हे बाळ वलसाड येथे राहणाऱ्या भूषण सिंग (४६) यांना दोन लाख ३५ हजारांना विकले. २७ डिसेंबरला सकाळी या बाळाला घेऊन सिंग वलसाड येथील घरी गेले.

यासंदर्भातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणी गंभीर दखल घेत गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांनी गुप्त बातमीदाराकडूनमाहिती मिळवून पाचही जणांना अटक केली. तसेच मुलाची सुटका केली आहे.

9) पुण्यनगरी पृ. पान क्र. १

# आंदोलनकर्त्याने पालिका आयुक्तांच्या गाडीची फोडली काच

**नालासोपारा :** अनधिकृत बांधकामाच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणे वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना चांगलेच भोवले असून, आंदोलनकर्त्या तरुणाने आयुक्तांचे लक्ष वेधण्यासाठी चक्क कारची काच लाकडी दांड्याने फोडून आपला वर्षभराचा निषेध व्यक्त केला. शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे आयुक्त अनिलकुमार पवार हे आपल्या खाजगी इनोव्हा क्रिस्टा गाडीने पालिका मुख्यालयात पोहोचले होते. त्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या एका तरुणाने




आयुक्तांच्या गाडीची काच फोडली. हा सर्व प्रकार मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

जवळच असलेल्या विरार पोलिसांनी या तरुणाला ताब्यात घेतले असून, त्यावर कारवाई करण्यात येणार आहे. निखिल ऊर्फ नाना कोळेकर असे या तरुणाचे नाव असून, तो पालिका मुख्यालयाबाहेर गेल्या एक वर्षापासून अनधिकृत बांधकामांविरोधात उपोषणाला बसला आहे. मात्र, पालिका आयुक्त अनिलकुमार हे जाणीवपूर्वक कोणतीच कारवाई करत नसल्याने पालिका आयुक्तांचे लक्ष वेधण्यासाठी त्याने रागात आयुक्तांच्या गाडीची काच फोडल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात पब्लिक प्रॉपर्टीचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले.

CamScanner

दि. 07/01/2023

10) लोकमत पान क्र. 9

# दुचाकीच्या धडकेतील जखमी मुलाचा मृत्यू

## नालासोपारा-विरार लिंक रोडवर अपघात

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नव्याने सुरू झालेल्या नालासोपारा-विरार लिंक रोडवर बुधवारी रात्री झालेल्या अपघातात एका आठ वर्षीय निष्पाप



बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या रस्त्यावर दुभाजक,स्पीड ब्रेकर आणि पथदिवे नसल्यामुळे अंधाराचा फायदा घेत काही तरुण भरधाव ये-जा करताना दिसतात. मुलाच्या मृत्यूनंतर पालिकेने या रस्त्यावर दुभाजकाचे काम सुरू केले आहे.

आठ वर्षीय मुलगा कपिल भारती हा बुधवारी रात्री नऊच्या सुमारास वडील विक्रम भारती यांच्यासोबत उभा होता. यावेळी भरधाव वेगाने येणाऱ्या एका दुचाकीस्वाराने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मुलाला धडक दिली.

या धडकेत कपिल गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये नेले. मात्र, शुक्रवारी दुपारी बाराच्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. नालासोपारा पोलिसांनी आरोपीची दुचाकी जप्त केली असून,गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विलास सुपे यांनी 'लोकमत'ला सांगितले. आता प्रशासनाने तेथे काम सुरू केले आहे.

11) म. टा. पु. पान क्र. 1

# पोलिसांना ट्विटर खाते सुरू करण्याचे आदेश

**म.टा. वृत्तसेवा, वसई**

मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलिस आयुक्तालयाने आपले ट्विटर अकाउंट सुरू करावे, अशी मागणी वसईकरांनी केली आहे. नागरिकांच्या तक्रारी आणि समस्या सोडविण्यासाठी ट्विटर खाते महत्त्वाचे असून यासाठी पोलिस आयुक्तालयाने अधिकृत खाते सुरू करावे, तसेच त्यांना तसे आदेश द्यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री सचिवालय कक्षाकडे करण्यात आली होती. याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आदेश मुख्यमंत्री सचिवालयाने पोलिस आयुक्तालयाला दिले आहेत.

दोन वर्षांपूर्वी मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलिस आयुक्तालयाची नव्याने स्थापना करण्यात आली. सध्या आयुक्तालयामार्फत गुन्ह्यांची उकल करण्याचे प्रमाण जास्त असले, तरी गुन्हे घडतच आहेच. त्यामुळे तात्काळ तक्रार नोंदवण्यासाठी नागरिकांना ट्विटर हे माध्यम सोयीचे आहे. त्यामुळे आयुक्तालयाने स्वतःचे अधिकृत ट्विटर खाते सुरू करावे, अशी मागणी आम आदमी पक्षाचे वसई विरार सहसचिव जॉय फरगोज यांनी केली आहे. आयुक्तालयाला याबाबत आदेश देण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री सचिवालय कक्षाकडेही केली होती. त्याची दखल घेत मुख्यमंत्री सचिवालयाचे पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी मकरंद देशमुख यांनी कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

CamScanner

लोकमत

# वसईतील कंपन्यातून चोऱ्यांचे प्रमाण वाढले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : वसईतील कंपन्यांतून विविध साहित्याची चोरी होण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. वसई फाटा येथे कंपनीतील स्टीलच्या डब्यांचा कच्चा माल चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. पिंकी इंडस्ट्रीजमध्ये चावलाराम चौधरी (५५) यांची स्टीलचे डबे बनविण्याची कंपनी आहे. ३ जानेवारीच्या रात्री चोरट्यांनी कंपनीच्या बाथरूमच्या उघड्या खिडकीवाटे प्रवेश करत डबे बनविण्यासाठी ठेवलेले ६१ हजार रुपये किमतीचे स्टीलचे सर्कल चोरून नेले आहेत. गुरुवारी पेल्हार पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

दुसऱ्या घटनेत वसईच्या गौराईपाडा येथील पी. पी. फॅसेन कंपनीमध्ये ३ जानेवारीच्या रात्री कंपनीची खिडकी तोडून चोरट्यांनी आत प्रवेश करत ७४ हजार ३७० रुपये किमतीचे ४०२ नग ट्राउझर पँटची चोरी करण्यात आली आहे. गुरुवारी वालीव पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# वसई - विरारमधून अल्पवयीन मुलींचे अपहरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : विरार येथे पंधरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले आहे. चंदनसार परिसरात राहणारी मुलगी बुधवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास मकवाना कॉम्प्लेक्स येथे क्लासला गेली होती. मात्र, तब्येत बरी नसल्यामुळे ती तेथून घरी जाण्यास निघाली. त्यानंतर ती घरी न परतल्याने तिचे आरोपीने अपहरण केल्याचा संशय आल्याने मुलीच्या आईने बुधवारी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे, तर दुसऱ्या घटनेत वसईत खाऊ आणण्यासाठी गेलेली मुलगी बेपत्ता झाली आहे. वसईच्या अंबाडी रोड परिसरात राहणारी मुलगी बुधवारी संध्याकाळी पाचच्या सुमारास खाऊ आणण्यासाठी गेली होती. मात्र, त्यानंतर ती घरी न परतल्याने आरोपीने तिचे अपहरण केल्याचा संशय आल्याने मुलीच्या आईने बुधवारी माणिकपूर पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला.

Hello Vasai
Page No. 1 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# आय विटनेस

## विद्यार्थ्यांनी पटवले नशामुक्तीचे महत्त्व



आचोळे आणि अर्नाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिस 'रायझिंग डे सप्ताह' गुरुवारी साजरा करण्यात आला. यावेळी जे.बी.एस हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी नशामुक्ती जनजागृती रॅली काढून त्याचे महत्त्व पटवून दिले. तर अर्नाळा पोलिसांनी गोकुळ टाऊनशिप येथील मुलजी भाई मेहता इंटरनॅशनल शाळेत जाऊन तेथील शेकडो विद्यार्थ्यांमध्ये नशामुक्तीबाबत जनजागृती करून, वाहतुकीचे नियम, पोक्सो, महिला अत्याचार कायद्याबाबत मार्गदर्शन केले. (छाया : मंगेश कराळे)

Hello Vasai
Page No. 4 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

चालण्याग रातकरा पतात आहत.

# दुचाकी जाण्यास जागा न दिल्याने ट्रकला लावली आग

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : रस्त्यातून जात असताना ट्रकने पाठीमागून येणाऱ्या तीन दुचाकींना पुढे जाण्यासाठी जागा न दिल्याने झालेल्या वादावादीतून महामार्गावर ट्रकला आग लावल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

राजस्थान येथील शंकर सिंग राजपूत (४५) हे आपल्या ताब्यातील ट्रक घेऊन बुधवारी पहाटे चारच्या सुमारास मुंबई- अहमदाबाद महामार्गावरून बापाने ब्रिज येथून न्हावाशेवा येथे जात होते. यावेळी येथूनच त्यांच्या पाठीमागून तीन दुचाकींवरील जाणाऱ्यांना पुढे जाण्यासाठी जागा न दिल्यामुळे रागातून दुचाकीचालकांनी ट्रकवर दगडफेक केली होती. तसेच ट्रकचालकाला शिवीगाळ आणि दमदाटी करून ट्रक थांबवण्यास भाग पाडले. ट्रकचालकाने गाडी थांबवल्यानंतर चालकाला मारहाण करून ट्रकला आग लावली. यात ट्रकचालकाच्या केबिनचे मोठे नुकसान झाले आहे. बुधवारी वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 4 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# तंबाखूजन्य पदार्थ पोलिसांकडून जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर लाखोंचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात वालीव पोलिसांना यश आले आहे. महामार्गावर लक्ष्मी धाब्याजवळ बुधवारी पहाटे साडेचारच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली होती.

यावेळी वसई विरार महानगरपालिका अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवत असताना कार संशयास्पदरीत्या आढळून आली होती. या कारची झडती घेतली असता तन्मय घरत, कल्पेश भोईर व जिग्नेश शहा यांच्या ताब्यातून विविध कंपन्यांचा सुगंधी पानमसाला व तंबाखू तसेच चारचाकी गाडी असा एकूण १९ लाख ८२ हजार ५६० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला. वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 4 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# ऑनलाइन लॉटरी जुगाऱ्यांवर कारवाई



**नालासोपारा :** नालासोपारा येथे ऑनलाइन लॉटरी चालवणाऱ्या दुकानावर पोलिसांनी कारवाई केली आहे. रेल्वे स्थानकासमोर अरिहंत शॉपिंग सेंटरमधील गाळा नंबर २१ मध्ये गुरुवारी संध्याकाळी पाचच्या सुमारास देवीदास पटेल (३८) यांनी राजश्री डॉट इन नावाने ऑनलाइन जुगारावर पंधरा मिनिटांनी निकाल जाहीर करत जुगार सुरू ठेवला होता. यावेळी ग्राहक रमेशचंद्र कुमार (३०) याला ऑनलाइन जुगार खेळताना पोलिसांनी रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून १३ हजार २३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन जणांविरोधात आचोळे पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# दुचाकीच्या धडकेतील जखमी मुलाचा मृत्यू

## नालासोपारा-विरार लिंक रोडवर अपघात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नव्याने सुरू झालेल्या



नालासोपारा-विरार लिंक रोडवर बुधवारी रात्री झालेल्या अपघातात एका आठ वर्षीय निष्पाप बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या रस्त्यावर दुभाजक,स्पीड ब्रेकर आणि पथदिवे नसल्यामुळे अंधाराचा फायदा घेत काही तरुण भरधाव ये-जा करताना दिसतात. मुलाच्या मृत्यूनंतर पालिकेने या रस्त्यावर दुभाजकाचे काम सुरू केले आहे.

आठ वर्षीय मुलगा कपिल भारती हा बुधवारी रात्री नऊच्या सुमारास वडील विक्रम भारती यांच्यासोबत उभा होता. यावेळी भरधाव वेगाने येणाऱ्या एका दुचाकीस्वाराने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मुलाला धडक दिली.

या धडकेत कपिल गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये नेले. मात्र, शुक्रवारी दुपारी बाराच्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. नालासोपारा पोलिसांनी आरोपीची दुचाकी जप्त केली असून,गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विलास सुपे यांनी 'लोकमत'ला सांगितले. आता प्रशासनाने तेथे काम सुरू केले आहे.

Mumbai Main
Page No. 11 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# नायलॉन मांजाच्या विक्री, वाहतुकीवर 'बॅन'

## पोलिस आयुक्तांचा कारवाईचा इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : संक्रांतीचा सण आठवडाभरावर आला असून शहरात पतंग विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्याअनुषंगाने पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नायलॉन मांजाच्या ऑनलाइन विक्री, उत्पादन, साठवणूक आणि वापरासह वाहतुकीवर बंदी असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. नायलॉन मांजा ऑनलाइन किंवा कुरिअरद्वारे खरेदी, विक्री व पुरवठा करताना किंवा जवळ बाळगताना आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी दिला आहे.

नायलॉन मांजाच्या वापरामुळे शहरातील बऱ्याच नागरिकांना गंभीर स्वरूपाच्या जखमा होतात. तसेच दुचाकी वाहनचालक किंवा पक्षी नायलॉन मांजात अडकून गंभीर जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नायलॉन मांजा नागरिकांच्या जीविताला व आरोग्याला धोका निर्माण करतो. त्याचप्रकारे नायलॉन मांजा रस्त्यावर, खांबावर तसाच अडकून राहतो. सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित ठेवण्याकरिता पोलिस आयुक्तांनी मकर संक्रांतीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिक व व्यावसायिकांना नायलॉन मांजा, प्रतिबंधित साहित्य, ऑनलाइनद्वारे पुरविण्यास तसेच नायलॉन मांजा कुरिअरद्वारे वाहतूक करण्यास मनाई आदेश जाहीर केले आहेत.

### २४ फेब्रुवारीपर्यंत मनाई आदेश

नायलॉन मांजाबाबतचा हा मनाई आदेश २६ डिसेंबर ते २४ फेब्रुवारीपर्यंत लागू राहील. १४ जानेवारीला मकर संक्रांतीचा सण असून, या काळात शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर पतंग उडवून सण साजरा करतात. या सणाच्या निमित्ताने शहरात मोठ्या प्रमाणात नायलॉन मांजाची खरेदी-विक्री केली जाते.

### महापालिकेचेही असणार तपासणी पथक

महानगरपालिका क्षेत्रांतर्गत नायलॉन मांजाचा वापर व विक्री प्रतिबंधित करण्याकरिता कारवाई करण्यासाठी झोननिहाय पथक गठित करण्याची शक्यता आहे.

Hello Vasai
Page No. 2 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

लोकमत इन्फोग्राफिक्स

# सायंकाळी आठआधीच करा 'सायबर' तक्रार!




मंगेश कराळे |लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** सोशल मीडियावर खासगी डेटाची चोरी झाल्यास काय करावे हे अनेकांना कळत नाही. तसेच ऑनलाइन पेमेंट करताना अनेकदा लोकांची फसवणूक केली जाते. असे कोणाच्याही बाबतीत घडल्यास सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करणे आवश्यक असून त्यासाठी पोलिस आयुक्तालयाच्या सायबर पोलिस विभागात सकाळी १० ते रात्री आठ वाजेपर्यंत तक्रार करता येते. तसेच त्या दिवशी जर नाही झाले तर दुसऱ्या दिवशीही तक्रार करता येते.

## हेल्पलाइनचा नंबर काय?

सायबर गुन्ह्यांची ऑनलाइन तक्रार नोंदविण्यासाठी १९३० हा हेल्पलाइन क्रमांक पोलिस आयुक्तालयाने सामान्य नागरिकांसाठी उपलब्ध करून दिला आहे.

## नागरिकांना अशा गुन्ह्यात करता येते तक्रार

सायबर गुन्हे विशेष करून हॅकिंग, बाल लैंगिक चित्रण इ. स्वरुपात घडताना दिसतात. याशिवाय खासगी किंवा गोपनीय माहिती चोरणे, फोडणे आदी प्रकारही सायबर गुन्ह्यांमध्ये मोडतात. अशा प्रकारांमध्ये सायबर पोलिस ठाण्यात तक्रार करता येणार आहे.

## थेट सायबर पोलिस ठाण्यात जाऊ शकता

काही शहरांमध्ये सायंकाळी सहानंतर सायबर गुन्ह्यासंदर्भात तक्रार करण्यासाठी कक्ष कार्यालयात संपर्क साधावा लागतो. मात्र पोलिस आयुक्तालयाचे सायबर पोलिस ठाणे सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत कार्यरत असल्याने नागरिक समस्या घेऊन थेट सायबर पोलिस ठाण्यात जाऊ शकतात. दुसऱ्या दिवशीही तक्रार करता येते.




## वेबसाइटवरूनही तक्रार करणे शक्य

सायबर क्राइमसंदर्भात नॅशनल सायबर क्राइम पोर्टलवर www.cybercrime.gov.in तसेच आयुक्तालयाच्या सायबर मेल आयडीवरही पीडितांना तक्रार करणे शक्य आहे.

## नागरिकांनी सतर्क राहावे

सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या क्लृप्त्या करून नागरिकांची ऑनलाइन फसवणूक करतात. त्यांच्या जाळ्यात न अडकण्यासाठी सतर्क राहणे व बक्षीस, पैशांचा मोह टाळणे आवश्यक आहे. नागरिकांची ऑनलाइन फसवणूक किंवा डेटा चोरी, छेडछाड झाल्यास त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात तात्काळ संपर्क साधावा.

**- सायबर विभाग**

## शनिवार, रविवारी सर्वाधिक तक्रारी

शनिवार व रविवारी बँका बंद असतात, त्यामुळे तक्रारदाराला खातरजमा लवकर करता येऊ नये व बँकांची मदत घेताना अडचणी याव्यात यासाठी सुटीचा दिवस शोधून गंडविले जाते.

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्षः 26 अंक-204 मुंबई, शनिवार 7 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# सैकड़ों विद्यार्थियों के बीच मनाया गया राइजिंग डे सप्ताह




**वसईः** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत अर्नाला और आचोले पुलिस स्टेशन द्वारा पुलिस राइजिंग डे सप्ताह के रूप मनाया गया है। 5 जनवरी को अर्नाला पुलिस द्वारा जे मूलजी भाई मेहता इंटरनेशनल स्कूल गोकुल टाउनशिप विरार वेस्ट ने स्कूल में जाकर विद्यार्थियों को नशे के प्रति जागरूक किया। यातायात नियम, पोक्सो, महिला अत्याचार पर मार्गदर्शन और किसी भी तरह की शिकायत या मदद की स्थिति में पुलिस हेल्पलाइन नंबर 112 पर कॉल करें और तुरंत पुलिस सहायता प्राप्त करें। उस समय 100 से 120 छात्र मौजूद थे। इसी प्रकार आचोले पुलिस द्वारा जेबीएस हाई स्कूल अलकापुरी के विद्यार्थियों ने नशामुक्ति जागरूकता रैली निकाली। यातायात नियमों को लेकर दिशा-निर्देश दिए, और किसी भी तरह की शिकायत होने पर अगर आपको मदद की जरूरत हो तो पुलिस हेल्पलाइन नंबर 112 पर कॉल करें और आपको तुरंत पुलिस मदद मिल जाएगी, उस समय 100 से 150 छात्र मौजूद थे।

# संपादकीय

## जीवघेणा नायलॉन मांजा



जानेवारी महिना उजाडला की सर्वांना वेध लागतात ते मकर संक्रांत या सणाचे. मकर संक्रात हा हिंदू धर्मातील एक महत्वाचा सण मानला जातो. मकर संक्रातीनिमित्त पतंगोत्सव साजरा करण्याची आपल्याकडे खूप जुनी परंपरा आहे. रंगीबेरबगी पतंग आकाशात उडवून हा उत्सव साजरा केला जातो. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण पतंग उडवण्याचा आनंद या निमित्ताने घेत असतात पण अलीकडे हा खेळ जीवघेणा ठरत आहे. पूर्वी पतंग उडवण्यासाठी दोऱ्याचा किंवा घरगुती मांज्याच्या वापर केला जायचा आता मात्र पतंग उडवण्यासाठी नायलॉनच्या मांज्याच्या वापर केला जातो. हाच नायलॉन मांजा जीवघेणा ठरत आहे. मागील महिन्यातच दौंडमध्ये नायलॉन मांज्याने गळा कापून एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला होता. मागील वर्षी नाशिकमध्येही अशीच एक घटना घडली होती. पुण्यातही नायलॉन मांज्याने एका तरुण महिला पत्रकाराचा बळी घेतला होता. नायलॉन मांज्याने अनेक जण जखमी झाले आहेत. या मांज्यामध्ये अडकून आकाशात मुक्त विहार करणारे पक्षीही जखमी होतात काही पक्षी मरणही पावतात. चिनी बनावटीचा हा मांजा नायलॉन धागा, काचेचा चुरा, लोखंडाचे कण आणि रासायनिक पदार्थांपासून बनवला जातो. नायलॉन मांजा माणसांसह पक्षी आणि प्राण्यांसाठी देखील घातक आहे वास्तविक नायलॉन मांजाच्या खरेदी आणि विक्रीवर बंदी घालण्याचे आणि वापराबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. मांजामुळे पशुपक्षांना होणाऱ्या दुखापतीचा संदर्भात पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाने राज्य सरकारला पत्र पाठवले होते. नायलॉन मांजामुळे वन्यजीव (संरक्षण) अधिनीयम १९७२ अनुसुचितील वन्यप्राणी पक्षांचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांना दुखापत झाल्यास वन कायद्याच्या ९ नुसार कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते त्यामुळे महाराष्ट्र सरकारने नायलॉन मांज्याच्या खरेदी आणि विक्रीवर बंदी घातली होती. महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेली असतानाही हा मांजा दुकानात सर्रास विकला जात आहे. बंदी असूनही काही ठिकाणी लपून छपून तर काही ठिकाणी खुलेआम मांजा विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई होताना दिसत नाही. जो मांजा लोकांना दुकानात खरेदीसाठी मिळतो तोच मांजा प्रशासनाला कसा दिसत नाही? आणखी किती बळी गेल्यावर प्रशासनाला जाग येणार आहे? प्रशासनाने नायलॉन मांजा विरोधात धडक मोहीम राबवायला हवी. नायलॉन मांजा विकणारा आणि खरेदी करणारा अशा दोघांवर कारवाई व्हायला हवी. नागरिकांनीही नायलॉन मांजाने पंतग उडवण्याऐवजी दोरीचा वापर करून पतंग उडवावी आणि हा उत्सव साजरा करावा.

# धकाधकीच्या जीवनात पत्रकारांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणं आवश्यक - जॉन कोलासो

वसई :- आजच्या धकाधकीच्या जीवनात पत्रकारांवरील जबाबदारी वाढली असता त्यांच्यावर येणारा मानसिक व शारीरिक तणाव पाहता पत्रकारांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे असल्याचे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार जॉन कोलासो यांनी वसई तालुका पत्रकार संघाने पत्रकारांसाठी आयोजित केलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात बोलताना केले.

आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृती निमित्त पत्रकार दिनाचे औचित्य साधून वसई तालुका पत्रकार संघाने पत्रकारांसाठी आरोग्य तपासणे शिबीर वसईत व्होकार्ट हॉस्पिटलच्या सहाय्याने पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते, या कार्यक्रमाचे प्रस्तावित अध्यक्ष संदीप पंडित यांनी केले, यावेळी पत्रकार संघ पत्रकारांसाठी राबवित असलेल्या विविध योजना व आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. यावेळी उपस्थितांचे स्वागत संघाचे खजिनदार अरुण सिह यांनी केले. या कार्यक्रमात जेष्ठ पत्रकार जॉन कोलासो यांच्यासह माजी महापौर



नारायण मानकर, प्रवीण शेट्टी, माजी उपमहापौर प्रकाश रोड्रिक्स, परिवहन समिती सभापती भरत गुप्ता, तसेच वसई विकास बँक आणि वसई शेतकरी सोसायटीचे चेअरमन आशय राऊत आदी मान्यवर उपस्थित होते

या कार्यक्रमात बोलताना माजी महापौर नारायण मानकर यांनी सांगितले की पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून रोजच्या जीवनामध्ये अनेक अडचणींना सामोरे जात असताना आपल्या आरोग्याकडे त्यांचे अर्थातच दुर्लक्ष होत असते, ही बाब लक्षात घेऊन वसई तालुका पत्रकार संघाने आयोजित केलेला हा उपक्रम नक्कीच स्तुत्य आहे, यावेळी त्यांनी पत्रकारांना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

एकुणच या आरोग्य तपासणी शिबीरामध्ये व्होकार्ट हॉस्पिटलचे समन्वयक माधव अईल, डॉ. रिशिता राय, डॉ. अश्विनी खंदारे , परिचारिका हर्षिता मिश्रा,प्रवीण विश्वकर्मा, आदी टीमने उपस्थित पत्रकारांची आरोग्य तपासणी केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव आशिष राणे यांनी केले तर शेवटी आभार प्रदर्शन उपाध्यक्ष भरत म्हात्रे यांनी केले.

# ५ किलो गांजासह दोन सराईत आरोपी यांना अटक

## पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाची कारवाई

वसई : पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक - ०२/०१/२०२३ रोजी दुपारच्या सुमारास बिलालपाडा तलाव, बिलालपाडा, नालासोपारा (पु.), ता. वसई येथे एक इसम गांजा विक्री करण्याकरीता येणार असल्याची खात्रीशिर बातमी पेल्हार पोलीस गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोअे/सचिन बळीद यांना मिळाली. सदर बातमीचे आधारे मिळालेले बातमीचा आशय वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना कळवुन त्यांनी दिलेले आदेशान्वये लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन आरोपीत यांना शिताफिने ताब्यात घेऊन. सदर आरोपीत यांनी त्यांची नावे १) मैदुल शेख ऊर्फ बंगाली, रा. बिलालपाडा, नालासोपारा पुर्व २) सुनिल पवार, रा. नालासोपारा (प.) अशी असून नमूद आरोपीतांची अंगझडती घेऊन असता त्यांचे कब्जात ०५ किलो ५० ग्रॅम वजनाचा ७३,५००/- रुपये किंमतीचा गांजा नावाचा अंमली पदार्थ, ५,५००/- रुपये रोख रक्कम व एक मोटार सायकल असा एकुण - १,२९,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि.नं. ॥ १३/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ अधिनियम -१९८५ चे कलम -९(क), प्रमाणे दिनांक ०२/०१/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीतांना तपासकामी मा. न्यायालयान दिनांक ७/०१/२०२३ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे.

**दै. चौफेर संघर्ष कार्यालय**
कार्यालय संपर्क : ०२५०/२३३०४०९
पहिला मजला, आनंद श्रद्धा १०१, शास्त्री नगर, अंबाडी रोड वसई, ता. वसई, जि. पालघर, ४०१२०२, महाराष्ट्र

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक कैलास राजाराम रांगणेकर, यांनी एस. आर. पब्लिकेशन, **मोहन-अर्जुन कंपाऊंड, शॉप नं. ८,९,१० घरटन पाडाजवळ, वैशाली नगर, शेवटचा बसस्टॉप, दहिसर (पूर्व) मुंबई ४०००६८,** राज्य : महाराष्ट्र येथे छापून, १०१/पहिला मजला, आनंद श्रद्धा अपार्टमेंट, शास्त्रीनगर, अंबाडी रोड, गणपती मंदिराजवळ, वसई (प.) ता. वसई, जि. पालघर, पिन : ४०१२०२ येथून प्रसिध्द केले जाते. **संपादक : कैलास रा. रांगणेकर, मो.९८९०२०२९०७ • (सर्व न्याय वसई न्यायकक्ष) RNI NO. - MAHMAR/2015/66631**

# नियमांचे सर्रास उल्लंघन

## वसई, विरारमध्ये वाहतूक नियमांच्या उल्लंघनाच्या दीड लाख घटना

**सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता**

**वसई :** २०२२ या वर्षात वसई, विरार शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याच्या एकूण एक लाख ४५ हजार ९२७ प्रकरणांची नोंद झाली आहे. तीन कोटी ९९ लाख ९७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. यामध्ये वसई विभागाची दंडाची वसुली ७९ टक्के तर विरार विभागाची दंडाच्या वसुलीची टक्केवारी ही ४४ टक्के आहे.


शहरात विरार आणि वसई असे दोन वाहतूक विभाग आहेत. या विभागांकडून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येते. २०२२ या वर्षात वाहतूक नियमांच्या उल्लंघनाची एक लाख ४५ हजार प्रकरणे नोंदविण्यात आली. त्यामध्ये अवैध प्रवासी वाहतूक, विनापरवाना वाहन चालवणे, सीट बेल्ट न लावणे, सिग्नल तोडणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे, नंबर प्लेट न लावणे किंवा चुकीच्या नंबर प्लेट लावणे, चुकीच्या ठिकाणी पार्किंग करणे अशा विविध नियमांचा समावेश आहे.

विरार विभागात सर्वाधिक म्हणजे ८२ हजार प्रकरणांची तर वसई विभागात ६२ हजार ८४४ प्रकरणांची नोंद झाली. वसई आणि विरार विभागांनी एकूण ३ कोटी ९९ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. वसईतून २ कोटी ४३ लाख ७७ हजार तर विरार विभागातून एक कोटी ५६ लाख ९०० रुपयांच्या दंडाची वसुली करण्यात आली आहे. वसई विभागाची दंडाच्या वसुलीची टक्केवारी सर्वाधिक म्हणजे ७९ टक्के आहे. विरार विभागातून ४४ टक्के वसुली झाली आहे.

वाहतुकीचे नियोजन करणे, बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्याबरोबरच दंडाच्या वसुलीचे मोठे आव्हान आमच्यापुढे होते. २०२२ या वर्षात आम्ही दंडवसुलीवर भर दिला होता. त्यामुळे यंदा आमच्या विभागात दंडाची वसुली ही मागील वर्षाच्या तुलनेत जास्त म्हणजे ७९ टक्के एवढी झाली आहे. ती अधिक वाढविण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती वसई वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी दिली.

आम्ही वर्षभर विविध मोहिमा राबवून वाहनचालकांमध्ये जनजागृती करत असतो.

याशिवाय कारवाया करण्यासाठी नाकाबंदी तसेच विशेष मोहीम आखत असतो. कारवाईमुळे बेशिस्त तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर आळा बसेल असा विश्वास विरार वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम कारंडे यांनी व्यक्त केला.




### प्रमुख नियमांचे उल्लंघन

| ५८१ | ९९४ | ११००० | १०४१ | २८१० | १५६५ |
|---|---|---|---|---|---|
| विना हेल्मेट | मद्यप्राशन करून वाहन चालवणे | सीट बेल्ट न लावणे | विनापरवाना | सिग्नल | नंबर प्लेट |

दैनिक
आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : ११ | अंक: २५१ | शनिवार ०७ जानेवारी २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०४

# तक्रार किंवा मदतीच्या बाबतीत, पोलिस हेल्पलाइन क्रमांक ११२ वर कॉल करा - पोलिस

**वसई.** MBBV पोलीस आयुक्तालयांतर्गत अर्नाळा आणि आचोळे पोलीस ठाण्यांनी पोलीस रायझिंग डे सप्ताह म्हणून साजरा केला. जे.मुलजीभाई मेहता इंटरनॅशनल स्कूल गोकुळ टाऊनशिप विरार पश्चिम अर्नाळा पोलिसांतर्फे ५ जानेवारी रोजी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीबाबत प्रबोधन केले. वाहतूक नियम, पोक्सो, महिला अत्याचाराबाबत मार्गदर्शन व कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा मदत झाल्यास पोलीस हेल्पलाईन ११२ क्रमांकावर कॉल करा आणि तात्काळ पोलिसांची मदत घ्या. यावेळी १०० ते १२० विद्यार्थी उपस्थित होते.तसेच जेबीएस हायस्कूल अलकापुरीच्या विद्यार्थ्यांनी आचोळे पोलिसांची व्यसनमुक्ती जनजागृती रॅली काढली.

वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन केले,आणि काही मदत हवी असल्यास मदत करा. कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास पोलिस हेल्पलाइन क्रमांक ११२ वर संपर्क साधा, तुम्हाला तात्काळ पोलिसांची मदत मिळेल, यावेळी १०० ते १५० विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्य नगरी

# In Short

## पोलीस रायझिंग सप्ताहानिमित्त कार्यक्रम

**मीरा रोड :** मीरा रोड पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस रायझिंग सप्ताहाच्या अनुषंगाने गुरुवारी मीरा रोड पोलीस ठाणे हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांची बैठक पार्क व्हिव्य हॉटेलसमोर, मनपा गार्डन येथे आयोजित करून रायझिंग डेचे महत्व समजवण्यात आले. त्याचप्रमाणे त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यात आल्या व ज्येष्ठ नागरिकांसंदर्भात घडणारे फसवणूक, सोनसाखळी चोरी, बतावणी यासारखे गुन्हे तसेच एटीएम फ्रॉड, ऑनलाइन फ्रॉड व सायबर क्राईम याबाबत माहिती दिली व अशा वेळी त्यांनी काय खबरदारी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करून सूचना देण्यात आल्या. सकाळी व सायंकाळी चालण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांनी काय काळजी घ्यावी, याबाबत माहिती देऊन योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांना पोलीस ठाण्याचा दूरध्वनी क्रमांक देण्यात आला असून डायल ११२ बाबत माहिती दिली. केव्हाही फोन करून आपली अडचण सांगितल्यास तत्काळ पोलीस मदत देण्यात येईल, असे सांगण्यात आले.

पुण्य नगरी

# पोलीस भरतीच्या उमेदवारांना गुणाबाबत शंका असल्यास आयुक्तालयाशी संपर्क करावा

## पोलीस प्रशासनाचे आवाहन

**मीरा रोड :** पोलीस भरतीच्या उमेदवारांना गुणांबाबत शंका असल्यास ते आयुक्तालयाशी संपर्क साधून शंकेचे निरसन करू शकतात, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

मीरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयातील चालक पोलीस शिपाई पदांसाठी २ जानेवारी पासून थेट भरती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आलेली आहे. या भरतीमध्ये ९९६ पोलीस पदांसाठी भरती केली जाणार आहे. सलग तीन दिवस चालक पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया सुरू होती. मैदानी चाचणी पार करत कौशल्य चाचणी पात्र असणाऱ्या उमेदवारांची यादी व कौशल्य चाचणी ठिकाण व वेळ याबाबत उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर, मोबाइल क्रमांकावर कळवण्यात येणार आहे. चालक पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मैदानी चाचणीचे गुणपत्रक पोलीस आयुक्तालयाने सादर केले आहे.

चालक पोलीस शिपाई भरतीमधील शारीरिक चाचणूच्या गुणांची यादी ुपप.ॅस्त्रङ्की.ङ्मप.ह्ल या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. पोलीस मुख्यालयात यादी लावण्यात आलेली आहे. उमेदवारांना आपल्या गुणांबाबत कोणतीही शंका असल्यास त्यांच्या शंका दूर करण्यासाठी पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांना नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाईंदर पश्चिम येथे भेटून त्यांना असलेल्या शंकेबाबत विचारपूस करू शकतात. त्या व्यतिरिक्त रौ३१ह्लरँ1ु.पप@ॅस्त्रङ्की.ङ्मप.ह्ल या ई-मेलवर किंवा ०२२-३५००६११४ या फोन नंबरवर संपर्क साधू शकतात. भरती प्रक्रिया सुरू असलेल्या ठिकाणी गैरप्रकार होऊ नये व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी व उमेदवारांवर लक्ष ठेवण्यासाठी जवळपास ५० कॅमेरे लावण्यात आले असून, पोलिसांचे सीसीटीव्ही, भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे व हँडीकॅमद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्यांची बारीक नजर असणार आहे. ही प्रक्रिया जवळपास दोन महिने सुरु राहाणार आहे.संपूर्ण प्रक्रिया जलद व पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे.

Smart Mumbai Edition
Jan 7, 2023 Page No. 01
Powered by : eReleGo.com

# बेवारस वाहने गोदामात

भाईंदर : मीरा-भाईंदर शहरात गल्लोगल्लीत धूळखात पडलेली बेवारस वाहने वाहतुकीस अडथळात ठरत असल्याने महानगरपालिकेच्या मार्फत ती गोदामात हलविण्यास सुरुवात झाली आहे. गुरुवारी दुपारी ४ च्या सुमारास महानगर पालिकेच्या मार्फत नयानगर परिसरात रस्त्यावर धूळ खात असणाऱ्या ६ ऑटो रिक्षा,२ चारचाकी , २ टेम्पो अशे एकूण ८ बेवारस वाहने उचलून त्यांना पालिकेच्या एल. आर. तिवारी कॉलेजजवळ असणाऱ्या गोडाऊनमध्ये जमा करण्यात आली आहेत. बेवारस वहनांवर कारवाई करत २०,०००/- दंड आकारण्यात आला आहे. सदरची कारवाई मीरा-भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक. ४ कार्यक्षेत्रातील नरेंद्र चव्हाण अतिक्रमण विभाग प्रमुख यांच्या आदेशाने करण्यात आली असून यावेळी योगेश गुनिजन सहाय्यक आयुक्त/ प्रभाग अधिकारी, महेंद्र गावंड लिपीक, अनिल राठोड स्वच्छता निरीक्षक, सचिन साळुंके फेरीवाला पथक प्रमुख, म. सु. ब. जवान व मजूर उपस्थित होते.